An AIChE Technology Alliance
CCPS Center for Chemical Process Safety
www.aiche.org/ccps

Process Safety Beacon
http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx
उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

या आवृत्तीचे प्रायोजक
ioMosaic
www.iomosaic.com

# घरातील धोकादायक रासायनिक अभिक्रीया!

जून २०१६




घरगुती वापरातील स्वच्छता रसायनांचे मिश्रण प्राणघातक ठरू शकते हे आपणास माहित आहे का? सफाईच्या अनेक रसायनांमध्ये जलमिश्रित अमोनिया असतो. आपल्या घरांमध्ये सहसा वापरले जाणारे दुसरे एक रसायन म्हणजे ब्लीच – सोडीयम हायपोक्लोराइडचे पाण्यातील द्रावण. आपण ब्लीचचा वापर कपडे धुण्यासाठी करतो तसेच घरातील सर्वसाधारण सफाई व जंतूनाशनासाठीही वापरतो. जर आपण ही रसायने एकत्र मिसळली तर त्यांची रासायनिक अभिक्रीया होऊन क्लोरअमाइन्स नावाचे विषारी वायू तयार होतात. या वायूंचे श्वसन प्राणघातक ठरू शकते. ही रसायने मिसळल्यामुळे तसेच अन्य घरगुती वापरातील रसायने मिसळल्यामुळे घडलेल्या गंभीर आणि प्राणघातक दुखापतींच्या घटनांचे अनेक अहवाल तुम्हाला इंटरनेटवर पहावयास मिळतील.

पुढील महिन्याच्या बीकॉनमध्ये आपण केमिकल इंटरॅक्शन मॅट्रीक्स नावाच्या साधनाचा अभ्यास करणार आहोत ज्याचा उपयोग अनेक औद्योगिक आस्थापनांमध्ये विसंगत रसायने मिसळण्यातून निर्माण होणारे संभाव्य धोके लोकांपर्यंत पोचविण्यासाठी केला जातो.

## आपण काय करू शकता?

- हे बीकॉन तुमच्या कुटुंबियांस व मित्रमंडळींना दाखवा.
- तुमचे प्रक्रीया सुरक्षेतील ज्ञान तुमच्या घरी न्या! तुम्ही घातक रसायने व प्रक्रीयामध्ये काम करता याकारणे तुमच्याकडे विशेष अनुभव व प्रशिक्षण असते जे कार्यस्थळाच्या बाहेरही मोल्यवान असते. जसे तुम्ही तुमच्या कार्यस्थळाच्या ठिकाणी घातक रसायने हाताळताना जसे सुरक्षा उपायांचे पालन करता तसेच पालन करण्याची तुमच्या कुटुंबियांस व मित्रमंडळींना आठवण करून द्या. तुम्ही कोणा एकाचे प्राण वाचवू शकता! उदाहरणार्थ:
    - घरगुती वापराच्या उत्पादनांवरील इशाऱ्याची लेबल्स नेहमी वाचा आणि त्यांचा वापर व साठा करण्यासंबंधीच्या खबरदारीच्या सूचनांचे पालन करा.
    - उत्पादनाच्या लेबल्सवर नमूद केलेल्या सुरक्षा साधनांचा नेहमी वापर करा.
    - घरामध्ये घातक पदार्थ हाताळताना घातक वाफा पांगविण्यासाठी कामाच्या ठिकाणी पुरेसे वायूविजन असल्याची नेहमी खात्री करा.
    - घरगुती वापरातील उत्पादने, ती मिसळल्यावर होणाऱ्या संभाव्य अभिक्रीया व त्यांच्या दुष्परीणामांची पूर्ण माहिती मिळाल्याशिवाय ती मिसळू नका.
- तुमचे कुटुंबिय व मित्रमंडळी यांच्यासमोर एक आदर्श उदाहरण ठेवा. जेव्हा तुम्ही घरात घातक रसायने हाताळता, तेव्हा त्यांची तेवढीच काळजी घ्या जशी तुमच्या कामाच्या ठिकाणी घेता. जर तुम्हाला अन्य माणसे सुरक्षित उपाययोजनांशिवाय घातक रसायने हाताळताना आढळल्यास ती रसायने सुरक्षितपणे कशी हाताळावीत हे समजण्यात त्यांना मदत करा.

**तुमचे सुरक्षेतील ज्ञान कुटुंबियांपर्यंत पोहोचवा!**

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणासही पुनर्विक्रीसाठी वापर करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org किंवा 646&495&1371

हे बीकॉन सहसा अरेबिक, अफ्रीकन, चिनी, झेक, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, इटालियन, जपानी, कोरियन, मलय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रोमानियन, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तेलगू, थाई, तुर्की, आणि व्हीएतनामी इत्यादी भाशांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. Shirish Gulawani, Maharashtra, India.